# शाश्वत संस्था, मंचर ता. आंबेगाव जि. पुणे
## वार्षिक अहवाल सन – २०१८–१९

## संस्था पार्श्वभूमी:–

शाश्वत संस्थेची स्थापना १९९६ साली झाली आहे. परंतू संस्थेच्या कामाची सुरूवात कुसूम कर्णिक यांनी १९८१ पासून आंबेगाव तालुक्यातील डिंभे धरणामुळे विस्थापित झालेल्या व आदिवासी बांधवांबरोबर काम करायला सुरूवात केली. लोकांच्या गरजांवर कामाचे स्वरूप होते जसे जमिनीला बांध घालणे म्हणजे पडकई, जमिनीची नोंद करणे, खाते फोड करणे, पाण्यासाठी विहीर, तळी खोदणे, हापसा बसविणे, कुपोषण कमी करण्यासाठी बालवाडया, शाळा व आरोग्य कार्यक्रम, महिलांमध्ये जागृती येण्यासाठी, मेळावे, सेमिनार, दुग्धव्यवसाय. आपले अन्न आपण मिळविणे साठी गाळपेर, इ. मासेमारी, कातकरी प्रश्न, कातकरी घरकुल, निरधुर चुल्हा, कुकुटपालन, वृक्षारोपण, नर्सरी, जंगल प्रश्न, अभयारण्य हे सर्व उपक्रम आंबेगाव जुन्नर व खेड तालुक्यात राबविण्यात आले आहेत.

## सन २०१८–१९ या आर्थिक वर्षात संस्थेने राबविलेले उपक्रम


### १) गाळपेर शेती:–

डिंभे धरणामुळे विस्थापित झालेले आदिवासी शेतकरी धरणाचे पाणी कमी झाल्यावर गाळपेर शेती करतात यामध्ये ७०० ते ८०० हेक्टर क्षेत्र ४–५ महिने करिता रिकामे होते. डिंभे जलाशयात सन २००६ पासून संस्थेमार्फत गाळपेर शेती उपक्रम चालु आहे. डिंभे जलाशयात सुमारे २२०० हेक्टर क्षेत्र व्यापलेले आहे. ३५० हेक्टर क्षेत्रावर बाजरी, गहू, मेथी, हरभरा व अन्य पिके घेतली जात आहेत. ३२३ शेतकरी आज गाळपेर शेती करुन स्वत:च्या शेतात काम करुन पुरेसे उत्पन्न घेत आहेत. रोजगाराकरिता होणारे स्थलांतर थांबावे व १२ महिने पुरेल एवढे उत्पादन निर्माण करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह करता येईल या उद्देशाने गाळपेर शेती प्रकल्प सुरू करण्यात आला आहे


सन २०१८–१९ मध्ये गाळपेर शेतीसाठी मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या मार्फत गाळपेर शेती प्रकल्प राबविण्यात आला. शेतीसाठी बिज, ट्रेनिंग एक्पोजर व्हिजिट करून वेगवेगळया प्रकारचे मार्गदर्शन शेतकऱ्यांना करण्यात आले. गाळपेर शेती केल्यामुळे जंगलतोड कमी झाली आहे. रोजगारासाठी होणारे स्थलांतर थांबले आहे. गाळपेर शेतीमुळे आर्थिक उत्पन्न व दोन वेळेच्या अन्नाचा प्रश्न सुटत असल्यामुळे अनेक आदिवासी शेतकऱ्यांकडून गाळपेर शेतीसाठी मागणी होत आहे.

# उत्पादन सन २०१८–१९

| अ.क्र | उत्पादन | दर | सन २०१७–१८ (किलो) | सन २०१८–१९ (किलो) | वर्ष (रूपये) | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | 17-18 | 18-19 |
| 1 | गहु | 23 | 3350 | 40300 | 77050 | 926900 |
| 2 | हरभरा | 43 | 0 | 9540 | 0 | 410220 |
| 3 | बाजरी | 20 | 2400 | 34150 | 48000 | 683000 |
| 4 | धना | 10 | 0 | 19586 | 0 | 195860 |
| 5 | मेथी | 10 | 0 | 13095 | 0 | 130950 |
| | | | | 116671 | 125050 | 2346930 |




गाळपेर लाभार्थी









## २) आरोग्य:—

**१) मर्सिडिज बेन्झ:—**आदिवासी भागात आरोग्याचे प्रश्न आजही खूप दिसून येत आहेत. पूर्वी आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण खूप होते. लहान मुले मृत्यू होण्याचे प्रमाण जास्त होते. खाण्यासाठी लोकांना पुरेसे अन्नधान्य उपलब्ध नव्हते. या सर्व गोष्टींचा अभ्यास करून आरोग्याचे काम केले जात आहे. महिलांचे आरोग्याचे काम जास्त केले जात आहे.

महिलांमध्ये जागृती करणे, आरोग्याची काळजी घेणे, तथापी संस्थमार्फत महिलांना ट्रेनिंग देण्याचे काम चालु आहे. महिलांना वेळेवर हॉस्पिटलमध्ये आणणे, त्यांच्यावर औषधोपचार करणे वेगवेगळे कॅम्प घेऊन महिलांचे विविध ऑपरेशन करून घेण्यात आली आहे.


**२) बर्नास वेन्नरः—** बर्नास वेन्नर नॉर्व यांच्या मार्फत आदिवासी भागात १९९९ सालापासून आरोग्यावर संस्थेचे काम चालु आहे. आरोग्य या उपक्रमांमधून सन १९९९ ते २०१८ पर्यत एकुण २५३९ लाभार्थ्यांना फायदा झाला आहे.

**संस्थेमार्फत पुर्वी राबविण्यात आलेले उपक्रम**




# सन २०१८—१९ मध्ये आरोग्य कार्यक्रमाअंतर्गत राबविलेले उपक्रम

## कार्यक्रमास उपस्थित असलेले लाभार्थी




## ऑपरेशन केलेले पेंशट




सन २०१८—१९ वर्षात आरोग्य कार्यक्रमाला १७९४ लाभार्थी उपस्थित होते.

सन २०१८—१९ वर्षात आरोग्य कार्यक्रमातून १८७ पेंशटचे ऑपरेशन करण्यात आले आहे.






शाश्वत संस्था, मंचर



## ३) शाळा:—

संस्थेमार्फत आदिवासी भागात सन २००२ सालापासून आघाणे या आदिवासी गावात निवासी, विनाअनुदानित शाळा सुरू केली आहे. शाळेमध्ये कातकरी, महादेव कोळी, ठाकर, बौध्द, फासेपारधी या समाजाची एकुण ८८ इ. मुले शिक्षण घेत आहे. शाळेमध्ये मुलींचे प्रमाण नेहमी जास्त असते. सर्व मुलांना मोफत शिक्षण दिले जाते. शाळेत शिक्षकांसाठी व विद्यार्थ्यांसाठी विविध उपक्रम राबविले आहेत. ज्ञानप्रबोधिनी पुणे, डोअरस्टेप स्कूल, क्वेस्ट संस्था, सोनाळे यांच्यामार्फत प्रशिक्षण उपलब्ध करून देण्यात आले. सन २०१८—१९ पर्यत एकुण ३१० विद्यार्थी शिक्षण घेऊन गेले आहेत.शाळेतील भौतिक सुविधांमध्ये सोलर, वाटर हिटर, Garden Equipment बोलक्या भिंती, तारेचे कुंपण C.C. TV कॅमेरे शौचालये, विविध खेळांची साधने उपलब्ध आहेत.






# ४) बालवाडी:—

आदिवासी भागात कुपोषणाचे प्रमाण जास्त असल्यामुळे संस्थेने पहिला उपक्रम म्हणून बालवाडी उपक्रम चालु केला होता. सुरूवातीच्या काळात ३२ बालवाडया चालविल्या जात होत्या. या सर्व बालवाडयाचे सरकारी अंगणवाडीत रूपांतर करण्यात आले आहे. सन २०१८—१९ मध्ये संस्था ७ बालवाडया चालवित आहे. बालवाडयामध्ये महादेव कोळी, ठाकर कातकरी या समाजाची एकुण ९० मुले शिक्षण घेत आहेत. बालवाडी शिक्षकांना वेगवेगळे ट्रेनिंग, एक्पोजर व्हिजट चे आयोजन संस्था करत आहे. संस्थेमार्फत मुलांना पोषक आहार, गणवेश, खेळणी इ मदत संस्था करत आहे.






## ५) दुग्धव्यवसाय :—

टाटा मोटर्स व शाश्वत संस्था मंचर मार्फत आंबे, ता. जुन्नर येथे सन २०१७—१८ मध्ये व सन २०१८—१९ मध्ये डेअरी प्रकल्प राबविण्यात आला. आदिवासी व दलित कुंटुबाना शाश्वत संस्थेमार्फत ६२ म्हैस वाटप करण्यात आल्या. ट्रेनिंग वजन काटा व दुधाचे कॅन संस्थेमार्फत देण्यात आले. दुग्धव्यवसायामुळे रोजगाराकरीता होणारे स्थलांतर थांबावे. लोंकाचे आर्थिक उत्पन्नात वाढ व्हावी याकरिता हा प्रकल्प सुरू केला होता. या व्यवसायामुळे एका शेतकऱ्यास महिन्यास १० ते १५ हजार रूपयांचे आर्थिक उत्पन्न मिळत आहे.




## ६) देवराई संवर्धन:—

आदिवासी भागांमध्ये देवासाठी राखून ठेवलेले जंगल म्हणजे देवराई होय. देवरायांमधील झाडांचे संगोपन व संवर्धन करण्यासाठी देवराई हा उपक्रम संस्थेने हाती घेतला आहे. अनेक देवराया विरळ होताना दिसत आहेत. देवरायांमध्ये अधिकाधिक झाडे व लावणे, त्यांचे संवर्धन व संरक्षण करणे, देवरायांना कुंपण करणे, झाडांच्या शेजारी कट्टे तयार करणे. जंगल वाचविण्यासाठी देवरांयामध्ये देवराई बचावांच्या पाटया लावणे इ. काम करण्यात येत आहे. आदिवासी शेतकरी देवरायांमध्ये पर्यावरण संवर्धनाच्या संदर्भात यात्रा भरविण्याचे काम करत आहेत.

## ७) नैसर्गिक पाट योजना :—

कुशिरे बुद्रुक, बेंढारवाडी व पाटण येथे पुरातन काळापासून वापरात असलेले डोंगरातील ओढयांना वळण बांध घालून ते पाणी शेतीसाठी वापरात आणत असत. पाटाचे पाणी नैसर्गिक उताराने शेतीला दिल्यामुळे कोणतीही उर्जा वापरली जात नाही व पाणी मार्च, एप्रिल पर्यंत शेतीस उपलब्ध होते. परंतू सध्या तिनही ठिकाणचे पाट ना दुरूस्त असल्यामुळे व त्याची पडझड झाल्यामुळे ते वापरात येत नाही या पाटाचा प्रस्ताव गावातील शेतकऱ्यांनी संस्थेकडे सादर केला पाटाची दुरूस्ती केल्यास शेतकऱ्यांना त्या ठिकाणी ३ पिके घेणे शक्य होईल व त्यांच्या उत्पन्नात वाढ होईल या पाटाच्या दुरूस्तीमुळे सरासरी १४० एकर क्षेत्र ओलिताखाली येईल तसेच तिनही गावातील एकूण ९० ते १०० कुटूंबाना या योजनेचा लाभ हाईल व गावातच रोजगार उपलब्ध होईल व स्थलांतर थांबेल. सदर प्रकल्पाचे काम चालु आहे.

## ८) नळपाणी योजना, तळी खोदणे व बांधकाम करणे:—

संस्थेमार्फत पूर्वी खडकी टाक्या तयार करून दिल्या आहेत. गावापासून वाडी वस्ती पासून लांब असल्याने गावातील ग्रामस्थांनी शाश्वत संस्था, मंचर कडे नळ योजनेसाठी मागणी केली. त्यानुसार शाश्वत संस्थेने आहुपे, बालवीरवाडी, न्हावेड या ठिकाणी जावून सर्व्हे केला. महिलांना खूपच लांबून पाणी आणावे लागत होते त्यामुळे आजारामधे वाढ झाल्याचे दिसून येत होते व याचा विपरीत परीणाम आरोग्यावर होतो. गावातील तळयातून गावात वाडीत नळ पाणी योजना केल्यास त्याचा लाभ सर्व गावकऱ्यांना विशेष करून महिलांना जास्त फायदा झाला आहे. शाश्वत संस्थेने आहुपे, बालवीरवाडी, न्हावेड या तिनही ठिकाणी पाईपलाईन करून सोलर पॅनल मोटार बसून त्याद्वारे पाणी पुरवठा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

तसेच डोणी, पिंपरगणे या आदिवासी गावांत तळयातील गाळ काढणे, बांधकाम करणे व खोदकाम करणे ही कामे करण्यात आली आहेत.

| अ.क्र | तपशिल | लाभार्थी | एकुण मजुर | गावकरी श्रमदान | रोजगार दिवस |
|---|---|---|---|---|---|
| १ | आहुपे नळ योजना | 1092 | 0 | संपूर्ण श्रमदान | 0 |
| २ | न्हावेड नळ पाणी योजना | 393 | 57 | १०टक्के श्रमदान | 3 |
| ३ | डोणी तळे खोदकाम | 400 | 46 | १०टक्क श्रमदान | 2 |
| ४ | पिंपरगणे ३ तळे गाळ काढणे बांधकाम करणे | 230 | 530 | १०टक्क श्रमदान | 92 |
| | **एकुण** | **1885** | **633** | | **97** |




## ९) नर्सरी:—

शाश्वत संस्थेने मर्सिडिज बेन्झ चाकण यांच्या अर्थसहाय्याने दिगद येथे ३०००० झांडाची नर्सरी, शिनोली येथे ७५४०० झांडाची नर्सरी तयार करण्यात आली आहे. न्हावेड येथे महिलांचा गट तयार करून १०००० रोंपाची नर्सरीत तयार करण्यात आली आहे. नर्सरीमध्ये हिरडा, बेहडा, बांबु, करंज सिताफळ, आवळा, चिंच, शिवण, रिठा, बाहवा, अकाशिया,

आपटा, बोर, सादडा, जांभुळ, इ. प्रकारच्या बियांची लागवड करण्यात आली होती. ही रोपे वनविभागाच्या करारानुसार आघाणे व जांभळेवाडी व आहुपे येथील वयक्तिक मालकीवर, लावण्यात आली आहेत. नर्सरी प्रकल्पातून वर्षभर ४६५ आदिवासी लोंकाना रोजगार उपलब्ध झाला आहे.





## १०) वृक्षलागवड:—

शाश्वत संस्था सन २०१८—१९ पासून वृक्षारोपण या प्रकल्पावर काम करत आहे. दिवसेदिवस सर्व ठिकाणी पर्यावरणाचा ऱ्हास होत आहे. जंगलामध्ये वाढ व्हावी व पर्यावरणाचे संरक्षण व्हावे या उदेशाने संस्थेने वृक्षलागवड प्रकल्प हाती घेतला आहे संस्थेने सन २०१८—१९ या वर्षामध्ये आदिवासी भागात आहुपे, बालविरवाडी, आघाणे व जांभळेवाडी या ठिकाणी वृक्षलागवड केली आहे. वृक्षारोपणात हिरडा, बेहडा, बांबु, करंज सिताफळ, आवळा, चिंच, शिवण, रिठा, बाहवा, अकाशिया, आपटा, बोर, सादडा, जांभुळ, रोपे लावण्यात आली आहेत. वृक्षारोपणामुळे झाडांच्या संख्येत वाढ होऊन जंगल वाढीस मदत होणार आहे व ऑक्सिजनच्या प्रमाणात वाढ होणार आहे. रोपाची लागवड करण्यासाठी जागा पाहणे, त्रिस्तरीय करार करणे, रोप लावणे गवत काढणे, पाणी देणे, कुंपण करणे, जुलै ते ऑगस्ट या महिन्यात खड्डे खोदण्यात आले. इ. कामे करण्यात आली आहेत.

| अ.क्र | ठिकाण | वृक्षलागवड | एकुण मजुर |
|---|---|---|---|
| १ | आहुपे बालवीरवाडी | 13445 | 290 |
| २ | आघाणे | 2885 | |
| ३ | जांभळेवाडी | 2150 | |
| ४ | नैसर्गिक वाढ | 2500 | |
| | **एकुण** | **20980** | **290** |






## ११) मासेमारी:—

डिंभे जलाशयात विस्थापित झालेल्या आदिवासींना, भुमिहिन कातकरी समाजास मत्स्य व्यवसायातुन रोजगार उपलब्ध व्हावा रोजगाराकरिता होणारे स्थलांतर थांबावे. याकरिता शाश्वत संस्थेने सन २००६ साली डिंभे जलाशय श्रमिक आदिवासी मच्छिमार संस्था स्थापन केली. आज डिंभे येथे ३१४ मच्छिमार मासेमारी करून आपला उदर — निर्वाह करत आहेत. शासनाच्या (आदिवासी विभाग व NFDB, IIT) यांच्या सहकार्याने आज डिंभे येथे ७२ केजेसमध्ये IMC व शोभिवंत मत्स्य

पालन केले जात आहे. आज डिंभे येथे २३६ होडया व ४५०० किलो पेक्षा जास्त जाळयांच्या साहाय्याने आदिवासी मच्छिमारी करत आहेत. त्यामुळे रोजगार स्थानिक पातळीवर उपलब्ध होऊन स्थलांतर थांबले आहे.

बजाज कंपनीमार्फत सन २०१७ ते नोंव्हेबर २०१८ पर्यत डिंभे धरणामध्ये मासेमारी उपक्रम राबविण्या आला आहे. बजाज प्रकल्पामध्ये मच्छिमांराना जाळी वाटप, होडी वाटप, केजेस बनविणे ट्रेनिंग फिश टॅक बनविणे, मासे बिज खरेदी मांशाचे खाद्य बनविणे, व आजोला ची निर्मिती इ. उपक्रम राबविण्यात आले आहेत.

**मच्छिमाराना वाटप करण्यात आलेले साहित्य**

| अ.क्र | तपशिल | नग | लाभार्थी |
|---|---|---|---|
| १ | जाळी | 992 किलो | 194 |
| २ | होडया | 19 | 29 |
| ३ | केजेस | 12 | 194 |
| | **एकुण** | | **417** |







## १२) हिरडा प्रकल्प:—

आदिवासी भागात हिरडयाची झाडे मोठया प्रमाणात आहेत. बाळ हिरडा व मोठा हिरडा अशा दोन प्रकारचे हिरडे आदिवासी भागात आढळतात. बाळ हिरडयाचा भाव २०० ते २५० रूपये किलो व मोठा हिरडा १० ते १५ रूपये किलोनी बाजारामध्ये विक्री केली जाते. महिलांना हिरडा कसा फोडावा, फोल वेगळे कसे करावे, व हिरडा मशिन कशी हाताळावी याचे ट्रेनिंग व प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मशिन मिळाल्यामुळे महिलांना आनंद झाला महिलांनी स्वता: हिरडा फोल विक्री करावी यासाठी एक्पोजर व्हिजिटचे आयोजन आयुर्वेद रसशाळा पुणे येथे करण्यात आले होते. हिरडा प्रकल्प याही वर्षी चांगल्या रितीने महिला चालवित आहेत. हिरडा मशिन उपक्रमातून १५०० ते २००० लोंकाना या उपक्रमाचा फायदा होणार आहे.





## १३) दिवाळी फराळ वाटप:—

शाश्वत संस्था प्रत्येक वर्षी कातकरी कुंटंबाना दिवाळी फराळ वाटप करत असते त्याप्रमाणे याही वर्षी आंबेगाव कातकरी वस्ती, अडिवरे कातकरी वस्ती, शिनोली कातकरी वस्ती, डिंभे कातकरी वस्ती या ठिकाणी फराळ वाटप करण्यात आला.




## १४) उच्च शिक्षणांस मदत:—

संस्थेमार्फत आदिवासी भागातील गरजु मुलांमुलीना शिक्षणासाठी मदत केली जाते. नर्सिंग पदवी, एम एस. डब्लयु अशा कोर्ससाठी संस्थेकडून आर्थिक सहकार्य केले जाते.

**१)अनिता काठे:—**

अनिता सखाराम काठे ही आघाणे या आदिवासी गावातील मुलगी आहे. घरच्या परिस्थतीमुळे तिला शिक्षण घेणे परवडत नव्हते. संस्थेमार्फत एफ वाय व एस वाय बी ए चे शिक्षण पूर्ण करण्यात आले आहे.

**२) सोनु दिलीप मुदगुण:—** कुशिरे या आदिवासी गावातील रहिवासी असून पुणे येथे नर्सिंगचे शिक्षण घेत आहे. आर्थिक परिस्थती नसल्यामुळे संस्थेकडे तिने मागणाी केली होती. त्यानुसार संस्थेने तिला पुणे येथील ताराचंद फांउडेशन यांच्या मार्फत शैक्षणिक फी मिळवून देण्यात आली.

**३) तेजश्री बाबुराव कसबे:—** यांना MSW या कोर्सला ॲडमिशन घेतले होते तिने MSW पूर्ण केले आहे. संस्थेने MSW च्या कोर्ससाठी लागणारी मदत संस्थेने केली आहे.

# आय. आय. टी पवई विद्यार्थ्यांची संस्थेस भेट




मुंबई येथील आय. आय. टी पवई येथील अंतिम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी शाश्वत संस्थेने चालविलेल्या वनदेव विद्या मंदिर आघाणे शाळा, आहुपे देवराई, शाश्वत मार्फत चालविलेल्या सर्व उपक्रमांना भेट दिली तसेच मंचर येथे कुसुमताईंनी केलेल्या कामाविषयी माहिती घेतली.

## अर्थसहाय्य:–

१) मर्सिडिज बेन्झ, इंडिया कार प्लॅण्ट चाकण, पुणे
२) एम. बी. आर. डी. आय. बेंगलोर,
३) डी. एफ. एस. चेन्नई/पुणे
४) बजाज ऑटो, आकुर्डी
५) बर्नास वेन्नर, नॉर्वे
६) मोरडे फुडस, मंचर
७) टाटा मोटर्स, पिंपरी, पुणे
८) वैयक्तिक डोनेशन

## सन २०१९—२०२० या आर्थिक करावायाचे उपक्रम

१) गाळपेर शेती प्रकल्पातून २९३ कुंटुबाचा अन्नधान्याचा वर्षभराचा प्रश्न सोडविणे,
२) वृक्षलागवड प्रकल्पाअंतर्गत ३३ हजार झांडाचे संगोपन करणे व गावातील लोंकाना रोजगार उपलब्ध करून देणे
३) ४० आरोग्य महिलांबरोबर ३८ गावांमध्ये आरोग्य सेवा देणे महिलांमध्ये जागृती करणे महिला सक्षमीकरण वेगवेगळे कॅम्प घेणे
५) उच्च शिक्षणांसाठी आदिवासी मुलांमुलींना शिष्यवृत्ती मिळवून देणे व पुढील शिक्षणासाठी उत्तेजन देणे
६) हिरडा उद्योगाला चालना देणे
७) गावातील महिलांना स्वयंपूर्ण बनविण्यासाठी विविध व्यवसायिक प्रशिक्षण देणे व विक्री व्यवस्थापन करणे
८) पाण्याच्या तळे व विहिरींचे खोदकाम व बांधकाम करणे (८ ते १० गावांमध्य) करणे.
९) वन औषधी नर्सरी तयार करणे व लोंकाना उत्पन्न मिळविण्यासाठी प्रोत्साहित करणे.
१०) आंबा लागवड करून कलम करणे, १००० लाभार्थी निवडणे
११) देवराई संगोपण व संरक्षणासाठी विविध गावातील ग्रामस्थांमध्ये जागृती कार्यक्रम राबविणे

## बोर्ड ऑफ ट्रस्टीजः—



Vidya Bal
President

A Journalist by profession with 50 years of experience in editorial, journalism and social field. Worked with Kirloskar Publications, for 22 years as an Editor of "Stree" magazine. Started publication of Marathi magazine "Milun Saryajani" in 1989 and working in the capacity of Chief Editor till date. In 1982 started an organization by name “Nari Samata Manch” for upliftment of women and for creating awareness amongst women for their legitimate rights. A versatile personality with recipient of several awards for her valuable contribution in Editorial and social field.



## Suresh Rajwade
## Vice President
## & Managing Trustee

An Employee Relations & Human Resources professional with 38 years of experience in corporate sector. He is a Commerce graduate with Masters in Personnel Management and PGD in Ecology. Worked in senior managerial capacity with Kirloskar group for 20 years and with Mercedes-Benz India, Pune for 18 years having good track record in building Interpersonal Relationships and Human Resources Management. He was also responsible for CSR initiatives at Mercedes-Benz India, Pune.



## Kusum Karnik
## Founder Member
## & Trustee

She has done her Masters in Psychology. She is a founder member of Shashwat Trust having 47 years of work experience. She started working with tribals in Ambegaon, Junnar and Khed talukas of Pune district in Maharashtra since 1981 with the objective of reducing poverty of displaced tribal communities and to empower the tribal communities to address their concerns related to their entitlements, livelihood, human rights and social justice. A dynamic personality with recipient of 7 awards for her valuable contribution in the social field



Ashok Adhav

Treasurer

A technically qualified craftsman from Tata Motors Limited, Pune. Having 22 years of work experience in manufacturing sector at Bajaj Auto Limited, Pune. He has spent his childhood in Maharashtra Arogya Mandal, Narodi. He is one of the founder members of Shashwat Trust. Worked closely with Ms.Kusum Karnik and Late Anand Kapoor for last 20 years. Having strong inclination for working in social field especially for betterment of deprived communities.



A Civil Engineer by qualification having 48 years of experience in the field of Project Management and Water Resource Development. He was Executive Director at Water Resource Department of Maharashtra State. Post retirement he is working as a Consultant in private sector. Excellent technical background and hands on experience in the area of Water Resource Management.

Satish Bhingare

Trustee



She has done her graduation in Arts and Education as well as she has completed her Diploma in Child Guidance & School Management. Working with Shashwat Trust since 2003 and responsible for overall Administration of Residential School run by Shashwat Trust at Aghane village, Taluka Ambegaon as well as supports Shashwat's Office Administration since 2006. She is also responsible for Shashwat Trust's Balwadi's Training & Administration.

Pratibha Tambe
Truste



Sulochana Gawari
Trustee

She is a qualified Nurse by profession. Working with Shashwat Trust for last 10 years as Health Co-ordinator. She has completed her ANM Nursing Course and worked with various hospitals in Pune namely; Sancheti Hospital, Sant Dnyaneshwar Hospital, YCM Hospital and DY Patil Hospital as Nurse. She also worked at Government Residential School at Sonawale, Junnar as Superintendan

**Address-**

Shashwat Trust Opp. Thorat Building, Behind Market Yard, Manchar, Tal. Ambegaon, Dist. Pune 410503 Maharashtra, India

**Website:-** https://www.shashwattrustmanchar.org

**Email Id:-** – shashwattrustmanchar@gmail.com

**Phone No:-.** 2133-224107

# Income & Expenditure

SCHEDULE VIII
VIDE RULE 17(1)
NAME OF THE TRUST : SHASHWAT
REGISTRATION NO. : F 11985
BALANCE-SHEET AS AT 31.03.2019

| FUNDS AND LIABILITIES | SCH | AMOUNT ` | AMOUNT ` | PROPERTIES AND ASSETS | SCH | AMOUNT ` | AMOUNT ` |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TRUST FUND OR CORPUS FUND | | | - | IMMOVABLE PROPERTIES | | | - |
| OTHER EARMARKED FUNDS | | | 14,951,071.58 | INVESTMENTS | | | |
| (CREATED UNDER THE PROVISIONS OF | | | | | | | - |
| TRUST DEED OR SCHEME OR OUT OF THE INCOME) | | | | | | | |
| DEPRECIATION FUND | | | | FIXED ASSTES | "F" | | 4,706,474.39 |
| SINKING FUND | | | | | | | |
| RESERVE FUND | | - | | | | | |
| Shashwat Fund | | - | | | | | |
| FOREIGN CURRENCY CONTRIBUTION FUND | "A" | 1,485,199.84 | | | | | |
| INDIAN CURRENCY CONTRIBUTION FUND | "B" | 9,938,754.05 | | | | | |
| FIXED ASSET FUND | "C" | 3,527,117.69 | | | | | |
| ENDOWMENT FUNDS | | | 160,166.00 | | | | |
| MRS. NILIMA APTE MEMORIAL FUND (AS PER LAST BALACESHEET) | | 10,000.00 | | | | | |
| M.C.DIXIT MEMORIAL FUND ( AS PER LAST BALANCE SHEET) | | 100,000.00 | | | | | |
| | | 110,000.00 | | | | | |
| ADD : INTEREST ON ENDOWMENT FUND | | | | | | | |
| OPENING FOR THE YEAR | | 61,513.00 | | | | | |
| RECEIVED DURING THE YEAR | | 663.00 | | | | | |
| LESS : TRANSFERRED TO INCOME & EXPENDITURE A/C | | 12,010.00 | | | | | |
| LOAN (SECURED OR UNSECURED) | | | - | | | | |
| FROM TRUSTEES | | - | | | | | |
| FROM OTHERS | | - | | | | | |
| --OVERDRAFT FROM BANK OF MAHARASHTRA | | - | | | | | |
| (SECURED BY FIXED DEPOSITS) | | | | | | | |
| CARRIED FORWARD | | | 15,111,237.58 | CARRIED FORWARD | | | 4,706,474.39 |

KSHIRSAGAR KULKARNI & CO. ★ CHARTERED ACCOUNTANTS ★ Regn. No. 131762W

For SHASHWAT
Trustees

SCHEDULE VIII

VIDE RULE 17(1)

NAME OF THE TRUST : SHASHWAT

REGISTRATION NO. : F 11985

BALANCE-SHEET AS AT 31.03.2019

| FUNDS AND LIABILITIES | SCH | AMOUNT | AMOUNT | PROPERTIES AND ASSETS | SCH | AMOUNT | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|---|
| BROUGHT FORWARD | | | 15,111,237.58 | BROUGHT FORWARD | | | 4,706,474.39 |
| LIABILITIES | | | 35,000.00 | LOAN ( SECURED OR UNSECURED) | | | - |
| FOR EXPENSES | "D" | 35,000.00 | | | | | |
| For Sundry Creditors | | - | | | | | |
| FOR RENT AND OTHER DEPOSITS | | - | | | | | 142,769.05 |
| | | | | ADVANCES | | | |
| | | | | TO TRUSTEES | | - | |
| INCOME AND EXPENDITURE ACCOUNT | | | 3,834,944.14 | TO EMPLOYEES | | 6,906.05 | |
| BALANCE AS PER LAST BALANCE SHEET | | 3,703,863.46 | | TO CONTRACTORS | | - | |
| LESS : APPROPRIATION, IF ANY | | - | | TO LAWYERS | | - | |
| ADD : SURPLUS AS PER I & E A/C | | 131,080.68 | | TO OTHERS | "E" | 135,863.00 | |
| | | | | CASH AND BANK BALANCE | "G" | | 14,131,938.51 |
| TOTAL | | | 18,981,182.00 | TOTAL | | | 18,981,182.00 |

THE ABOVE BALANCE SHEET , TO THE BEST OF OUR BELIEF, CONTAINS A TRUE ACCOUNT OF THE FUNDS AND LIABILITIES AND OF THE PROPERTIES AND ASSETS OF THE TRUST

For SHASHWAT

Trustees.

TRUSTEES

SHASHWAT TRUST

PLACE : PUNE

DATE : 28/09/2019

NOTES TO ACCOUNTS FORM AN INTEGRAL PART THEREOF

SUBJECT TO OUR SEPARATE REPORT

EXAMINED AND FOUND CORRECT

FOR KSHIRSAGAR KULKARNI & CO

CHARTERED ACCOUNTANTS

FIRM REGISTRATION NO.131762W

KSHIRSAGAR KULKARNI & CO. Regn. No. 131762W CHARTERED ACCOUNTANTS

CA ANKUR KULKARNI

PARTNER

MEMBERSHIP NO. 134686

PLACE : PUNE

DATE : 28/09/2019

UDIN-19134686AAAACE5397

SCHEDULE- IX

VIDE RULE 17(1)

NAME OF THE TRUST- SHASHWAT

REGISTRATION NO.-F 11985

INCOME AND EXPENDITURE A/C FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2019

| EXPENDITURE | SCH | AMOUNT | AMOUNT | INCOME | SCH | AMOUNT | AMOUNT |
|---|---|---|---|---|---|---|---|
| TO EXPENDITURE IN RESPECT OF PROPERTIES- | | | 427,484.21 | BY RENT [ACCRUED ] | | - | - |
| RATES, TAXES AND CESS | | - | | [REALISED] | | - | |
| REPAIRS AND MAINTENANCE | | - | | | | | |
| SALARIES | | - | | BY INTEREST [ACCRUED ] | | 295,645.00 | 562,534.00 |
| INSURANCE | | | | [REALISED] | | 266,889.00 | |
| DEPRECIATION (BY WAY OF PROVISION OR ADJUSTMENTS) | | 427,484.21 | | ON SECURITIES | | - | |
| OTHER EXPENSES | | | | ON LOANS | | - | |
| | | | | ON BANK ACCOUNTS | | 266,889.00 | |
| | | | | ON FIXED DEPOSITS | | 295,645.00 | |
| TO LEGAL EXPENSES | | | 76,000.00 | BY DONATION AND GRANTS | "I" | 16,095,481.95 | 16,095,481.95 |
| | | | | BY INCOME FROM OTHER SOURCES | | | 529,585.57 |
| | | | | Interest On IT Refund | | 3,891.00 | |
| TO AMOUNT WRITTEN OFF | | | - | Gas Subsidy | | 4,415.61 | |
| 1.BAD DEBTS | | - | | DEPRECIATION ON FIXED ASSET FUND RECOGNISED | | 521,278.96 | |
| 2.LOAN SCHOLARSHIPS | | - | | | | | |
| 3.IRRECOVERABLE RENT | | - | | | | | - |
| 4.OTHER ITEMS - IMPAIRMENT OF ASSETS | | - | | | | | |
| TO MISCELLANEOUS EXPENSES | | | 54,618.26 | | | | |
| BANK CHARGES | | 13,073.66 | | | | | |
| INSURANCE | | 9,092.60 | | | | | |
| VEHICLE INSURANCE | | 30,996.00 | | | | | |
| INTEREST ON TDS | | 955.00 | | | | | |
| INTEREST ON BANK OD | | 501.00 | | | | | |
| CARRIED FORWARD | | | 558,102.47 | CARRIED FORWARD | | | 17,187,601.52 |

KSHIRSAGAR KULKARNI & CO. CHARTERED ACCOUNTANTS Regn. No. 131762 W

For SHASHWAT

Trustees.

SCHEDULE- IX

VIDE RULE 17(1)

NAME OF THE TRUST- SHASHWAT

REGISTRATION NO.-F 11985

INCOME AND EXPENDITURE A/C FOR THE YEAR ENDED 31ST MARCH 2019

| EXPENDITURE | SCH | AMOUNT ` | AMOUNT ` | INCOME | SCH | AMOUNT ` | AMOUNT ` |
|---|---|---|---|---|---|---|---|
| BROUGHT FORWARD | | | 558,102.47 | BROUGHT FORWARD | | | 17,187,601.52 |
| TO DEPRECIATION | | | 143,225.03 | | | | |
| TO AMOUNTS TRANSFERRED TO RESERVE OR SPECIFIC FUNDS | | | | | | | |
| TO EXPENDITURE ON THE OBJECT OF THE TRUST | "H" | | 16,355,193.35 | | | | |
| A) RELIGIOUS | | | | | | | |
| B) EDUCATIONAL | | 7,291,456.35 | | | | | |
| C) MEDICAL RELIEF | | 1,766,092.00 | | | | | |
| D) RELIEF OF POVERTY | | 329,811.29 | | | | | |
| E) PRESERVATION OF ENVIRONMENT | | 6,967,833.71 | | | | | |
| TO SURPLUS CARRIED OVER TO BALANCE SHEET | | | 131,080.68 | | | | |
| TOTAL | | | 17,187,601.52 | TOTAL | | | 17,187,601.52 |

NOTES TO ACCOUNTS FORM AN INTEGRAL PART THEREOF

FOR SHASHWAT

For SHASHWAT

Trustees

TRUSTEES

PLACE : PUNE

DATE : 28/09/2019

SUBJECT TO OUR SEPARATE REPORT

EXAMINED AND FOUND CORRECT

FOR KSHIRSAGAR KULKARNI AND CO.

CHARTERED ACCOUNTANTS

FIRM REGISTRATION NO.131762W

KSHIRSAGAR KULKARNI & CO. ★ CHARTERED ACCOUNTANTS ★ Regn. No. 131762W

CA ANKUR KULKARNI

PARTNER

MEMBERSHIP NO. 134686

PLACE : PUNE

DATE : 28/09/2019

UDIN-19134686AAAACE5397.